महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पुण्यश्लोक ३००

## पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड

दुरध्वनी क्र.. - ०२४६२-२१६३१६
E-mail Id- ig.nandedrange@mahapolice.gov.in

नियंत्रण कक्ष क्रमांक. - ०२४६२ -२१६२५३
बसवेश्वर चौक, नविन कौठा, सिडको रोड, नांदेड-४३१६०३

जा.क्र.पोउपमनि/आस्था-१/सपोनि-प्रशासकिय बदल्या-२०२५/२०२५/ 2211149 दिनांक ३०/०५/२०२५
30 MAY 2025

**वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ मधील कलम २२ न (२)**
**२) परिक्षेत्रीय पोलीस आस्थापना मंडळ यांचे दिनांक ३०/०५/२०२५ च्या बैठकीचे इतिवृत्त.**

**विषय :- नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या परिक्षेत्रांतर्गत सार्वत्रिक बदल्या-२०२५.**

--- ००० ---

**आदेश :-**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ (न) मधील पोट कलम (२) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन परिक्षेत्रीय पोलीस आस्थापना मंडळ यांनी विहीत कालावधी पूर्ण झालेल्या खालील नमुद **नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या प्रशासकीय** कारणावरुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हयात बदली करण्यास मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांचे नाव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचा घटक |
|---|---|---|---|
| १ | श्री संजय धोंडीराम निलपत्रेवार | नांदेड | १ वर्ष मुदतवाढ |
| २ | श्री शंकर भागचंद डेडवाल | नांदेड | हिंगोली |
| ३ | श्री श्रीनिवास कंठीराम राठोड | नांदेड | लातूर |
| ४ | श्रीमती दुर्गा बालाजीराव बारसे | नांदेड | १ वर्ष मुदतवाढ |
| ५ | श्री भालचंद्र पद्माकर तिडके | नांदेड | लातूर |
| ६ | श्री संतोष वामनराव केदासे | नांदेड | लातूर |
| ७ | श्री संकेत वसंतराव दिघे | नांदेड | १ वर्ष मुदतवाढ |
| ८ | श्री महादेव शिवाजी पुरी | नांदेड | १ वर्ष मुदतवाढ |
| ९ | श्री राजु दत्तराव वटाणे | नांदेड | १ वर्ष मुदतवाढ |
| १० | श्री.प्रभाकर श्रीराम कवाळे | परभणी | नांदेड |
| ११ | श्री.नरसिंग गणपती पोमनाळकर | परभणी | नांदेड |
| १२ | श्री.संदीप आनंदराव बोरकर | परभणी | १ वर्ष मुदतवाढ |
| १३ | श्री.विक्रम हनुमंतराव हराळे | परभणी | नांदेड |
| १४ | श्रीमती दिपाली विश्वास गित्ते | लातूर | परभणी |
| १५ | श्री.भाऊसाहेब बाबासाहेब खंदारे | लातूर | १ वर्ष मुदतवाढ |
| १६ | श्री.प्रविण मनोहरराव राठोड | लातूर | १ वर्ष मुदतवाढ |
| १७ | श्री.मो. रियाज मो. मुनीर शेख | लातूर | नांदेड |
| १८ | श्री.भिमराव शंकर गायकवाड | लातूर | १ वर्ष मुदतवाढ |

१. पोलीस अधीक्षकांनी या बदली आदेशाची प्रत संबधीत पोलीस अधिकारी यांना तात्काळ बजावून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. बदली झालेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करतांना पर्यायी/बदलीवर येणाऱ्या अधिकाऱ्यांची वाट पाहू नये.

२. मा.न्यायालय/मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/मा.निवडणुक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. बदली आदेशानंतर जे पोलीस अधिकारी रुग्णनिवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासुन स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे व कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांचे निवासस्थानी बजवावा.

४. संबंधित नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना बदली घटकात कार्यमुक्त करतांना त्यांना अदा करावयाच्या कार्यमुक्त आदेशात "संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांनी त्यांना कार्यमुक्त केले दिनांकापासून विहीत मुदतीत बदलीच्या घटकात निश्चितपणे हजर व्हावे आणि ते विहीत मुदतीत हजर न झाल्यास त्यांच्याविरुध्द पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/५५/०७, दिनांक ११.१.१९८४ व दिनांक २३.२.१९९७ मधील सूचनांप्रमाणे विनाविलंब शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात येईल" ही बाब स्पष्टपणे नमुद करावी.

५. बदली आदेशातील नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक दरम्यानच्या काळात निलंबित झाले असतील, तर अशा निलंबित नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना बदली ठिकाणी कार्यमुक्त न करता त्याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच अशी कोणतीही अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली असेल तर त्याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६. कोणत्याही घटकात निवडणूकीची प्रक्रीया किंवा त्याअनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटकप्रमुखांनी संबंधीत निवडणुक अधिकाऱ्याशी संपर्क साधून आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेवून संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करावे व तसा अनुपालन अहवाल सादर करावा.

७. बदली आदेशात नेमणुक केलेल्या ठिकाणात अशंत: बदल करणे/बदली रद्द करणे/बदलीस स्थगीती देणे अशा प्रकारच्या विनंतीची या कार्यालयातर्फे दखल घेतली जाणार नाही.

८. संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त केल्याचा आणि ते बदलीच्या घटकात हजर झ ाल्याचा दिनांक त्याच दिवशी ई-ऑफिसव्दारे या कार्यालयास सादर करावा.

30/5/25

**( शहाजी उमाप )**
**पोलीस उप महानिरीक्षक**
**नांदेड परिक्षेत्र, नांदेड**

प्रति,

पोलीस अधीक्षक, नांदेड, लातुर, परभणी, हिंगोली

**प्रत सविनय सादर-**

**मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत- गोपनीय शाखा, परिक्षेत्रीय पोलीस पत्रिका, पोउपमनि कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड